REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 10 | JULY - 2022

# ''महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकांचा सहभाग''

डॉ. रेकचंद गणपत गोंगले
एम.कॉम.,एम.फील.,पीएच.डी
सहयोगी प्राध्यापक,
स्नातकोत्तर वाणिज्य विभाग, नबीरा महाविद्यालय, काटोल.

## प्रस्तावना :—



प्रत्येक राष्ट्राचा आर्थिक विकास हा राष्ट्रातील उद्योजकतेवर अवलंबुन असतो. राष्ट्राचा अर्थिक विकास म्हणजे, राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यामध्ये सातत्याने वाढ घडवुन आणणे आणि विषमतेत घट करणे होय. यामुळे लोकांचे जीवन सुखी, संपन्न व सुसंस्कृत करण्याकरीता उद्योजकांनी पुढाकार घेवुन आवश्यक ते प्रयत्न केले तरच समाजात उत्पादनाचे कार्य सूरू होते. त्यामुळे समाजाला वस्तु व सेवा उपलब्द होतात. उद्योजकाशिवाय कोणत्याही प्रकारचे उत्पादन कार्य कधिही व कोठेही संभवत नाही तर विकासाची व सुधारणांची कल्पनांच करता येत नाही. उद्योजकता देशाचा आर्थिक यशाचा पाया आहे.

भारताच्या स्वातंत्रपुर्व काळात उद्योजकतेची वाढ संत गतिने झाली. स्वातंत्र्याच्या वेळी आपल्या अर्थव्यवस्थेतील उद्योगधंद्याचा पाया अतिशय सामान्य होता. उद्योगात समस्या फार मोठ्या प्रमाणात होत्या. उदा. भांडवलाची कमतरता, स्पर्धा, कच्चा मालाचा अभाव, विपणन समस्या, इत्यादी. स्वातंत्र्यानंतर औद्योगिकरणाची गरज लक्षात घेता शासनाने उद्योजकीय विकास संस्था आणि सल्लागार समिती स्थापन करून औद्योगिक धोरणाची प्रक्रिया सुरू झाली.

'उद्योजकता' हा शब्द फ्रेंच भाषेतील असून याचा मुळ अर्थ अंगीकृत करणे, स्वीकारणे, शोधणे, बदलणे असा होतो.

कोणत्याही व्यवसायाचे संचालन करतांना सामान्यपणे व्यवसायात ज्या गोष्टी केल्या जात नाहीत अशा सर्व गोष्टी वेगळ्या पध्दतीने करण्याच्या क्रियेला उद्योजकता असे म्हणतात, किंवा उत्पादनशिल क्रिया असे सुध्दा म्हणतात.

महिलांची उद्योजकता म्हणजे, महिलांनी स्थापन केलेली व संचालीत केलेले उद्योग होय. महिलांची उद्योजकता ही आपल्या देशातील आश्चर्यकारक बाब नसुन वैदिक काळापासुन तयार कपडे बनविणे, मातिची भांडी तयार करणे, भरत काम, सौंदर्य प्रसाधणे, सुवासिक तेल तयार करणे यात महिला तरबेज आहेत.

उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये एकंदरीत पुरुषांचे वर्चस्व असले तरी महिलांनीही उद्योजकतेची निकोप वाढ व्हावी याकरीता प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अपापल्या परिने योगदान दिले आहे. महिला उद्योजक ब—याच लोकामध्ये अधिक विकासाची प्रमुख प्रेरक शक्ती बनली आहे. महिला उद्योजकाबाबत 'जागतीक

उद्योजकता मॉनिटर' या संस्थेने नमुद केले आहे की, सुमारे ३४ देशामध्ये ७३ दशलक्ष उद्योजक लोकांमध्ये ४० प्रतिशत महिला उद्योजक आहेत.

उद्योजकता हा पुरुषांचे क्षेत्र आहे अशी जी मानसिकता होती ती आता बदलत्या काळानुसार बदलली आहे. आधुनिक काळात विकसित व विकसनशिल अशा दोन्ही प्रकारच्या समाजामध्ये महिला स्वत: पुढाकार घेवुन उद्योजकांची भुमिका पार पाडण्याकरीता तयार झाल्या आहेत. महिला उद्योजकता आजचे सत्य आहे. व्यापार, उत्पादकता, प्रक्रिया आणि सेवा या क्षेत्रात महिला मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभग घेत आहेत.

### संशोधनाची उद्दिष्टये :—

१. महिला उद्योजकतेच्या वाढीचा अभ्यास करणे.
२. महिलांच्या सामाजिक स्थितिचा अभ्यास करणे.
३. महिलांच्या आर्थिक स्थितिचा अभ्यास करणे.
४. महिला उद्योजकतेच्या वैशिष्टयांचा व कार्यांचा अभ्यास करणे.
५. महिला उद्योजकतेच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
६. महिला स्वयंसहायता बचत गटाचा अभ्यास करणे.

### गृहितकृत्ये (उपकल्पना ) :—

१. महिला स्वयंसहायता बचत गटामुळे महिला उद्योजकतेमध्ये वाढ झाली आहे.
२. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकाचा सहभाग आहे.
३. महिला उद्योजकतेच्या वाढीसाठी महाराष्ट्र सरकार प्रोत्साहन देत आहे.

### अभ्यास पध्दती :—

संशोधकाने ''महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकांचा सहभाग'' हा विषय अभ्यासला असून तथ्य संकलन पध्दतीतील दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

### उद्योजकता म्हणजे काय? :—

उद्योजकांनी नवनिर्मिती केल्यामुळे अर्थकारणातील स्थितिशिलता संपुष्टात येवुन चैतन्य निर्माण होते आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळते.

### व्याख्या :—

१. **हिगिंस यांच्या मते,** ''उद्योजकता हे गुंतवणुक आणि उत्पादनाची संधी शोधण्याचे, उत्पादनाची नवीन प्रक्रिया सुरु करण्याच्या दृष्टीने उपक्रमाला संघटित करण्याचे, भांडवल उभारणी करण्याचे, कामगारांना कामावर लावण्याचे, कच्चा मालाचा पुरवठा करण्याची व्यवस्था करण्याचे, उपक्रमाकरीता जागा शोधण्याचे, नवीन तंत्र व वस्तुची ओळख करुण देण्याचे, कच्चा मालाचे नवीन स्त्रोत शोधण्याचे, आणि उपक्रमाचे दैनंदिन व्यवहार चालावेत हयाकरीता वरिष्ठ व्यवस्थापकाची निवड करण्याचे कार्य आहे''.
२. **जोसेफ शुम्पीटर यांच्या मते,** उद्योजकता ही 'सृजनात्मक क्रिया' (Creative Activity) आहे. कोणत्याही व्यवसायाचे संचालन करतांना, सामान्यपणे ज्या गोष्टी केल्या जात नाहीत, अशा गोष्टी वेगळ्या पद्धतीने करण्याच्या क्रिया उद्योजकतेमध्ये समाविष्ट होतात.
३. **विलीयम डायमंड यांच्या मते,** ''उद्धोजकता म्हणजे नवीन आर्थिक क्रिया (उपक्रम) सुरु करण्यामध्ये अनुस्युत असलेली जोखीम स्वीकारण्याची तयारी, यामुळे अपरिहार्यपणे नसले तरी नवनिर्मिती घडुन येते. जोखीम स्वीकारणे व निर्णय घेणे हया क्रिया विशेष महत्वाच्या नसल्या तरी उद्योजकतेमध्ये नेहमी जोखीम स्वीकारणे व निर्णय घेणे ह्या क्रियांचा समावेश होतो''.

वरिल व्याख्यांनुसार कोणताही व्यवसाय सुरु करण्याकरिता भांडवलाची उभारणी करुण व जोखीम स्वीकारुण वस्तुंचा व सेवांचा पुरवठा ग्राहकापर्यंत पोहचवण्याकरिता वस्तुची नवनिर्मिती करण्याकरिता, ज्या क्रिया कराव्या लागतात, त्या सर्व क्रियांचा समावेश उद्योजकतेमध्ये होतो. यामध्ये रोजगाराची निर्मिती सुद्वा होते.

## महिला उद्योजकता :—

'स्त्री व पुरुष' हे समाजव्यवस्थेचे घटक असुन या दोघांची निश्चित व परस्परपुरक अशीच भुमिका आहे. या दोन्ही वर्गाच्या परस्परपुरक भुमिकेवर प्रत्येक कुटुंबाचे अस्तित्व व प्रगती आणि उन्नती अवलंबुन असते. उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये पुरुषांचे वर्चस्व असले तरी महिलांनी उद्योजकतेची निकोप वाढ व्हावी याकरीता प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये अपापल्या परिने योगदान दिले आहे. प्रत्येक यशस्वी उद्योजकामागे निश्चितपणे एक स्त्री असते. ती स्त्री कधी माता, पत्नी, मुलगीही अशु शकते.

'स्त्री' ही एक शक्ती आहे, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा एखादी महत्वाकांक्षी आणि अभिप्रेरित स्त्री पुढाकार घेवुन उद्योजकांची भुमिका स्वीकारते आणि ती भुमिका पार पाडण्यासाठी आवशक ते प्रयत्न करते तेव्हा अशा स्त्रीला महिला उद्योजक असे म्हणता येईल.

''कोणतीही महिला एखाद्या उद्योगाची स्थापना करून संचालण करते आणि या उद्योगाला यशस्वी होण्याकरीता सर्वतोपरी प्रयत्न करून सर्व कार्याची जबाबदारी स्वत: महिला पार पाडते तीला महिला उद्योजक असे म्हणतात.''

१९९१ साली भारत सरकार औद्योगिक धोरण विषयक ठरावामध्ये महिलांच्या उद्योजकतेबाबत प्रथम विचार करून महिला उद्योजकतेची व्याख्या करण्यात आली होती परंतु ती व्याख्या महिलांच्या उद्योजकतेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने हितकारक ठरू शकत नाही म्हणुन महिला उद्योजकतेची सुधारित व्याख्या पुढिल प्रमाणे करण्यात आली आहे.

"A small-scale industrial unit, industry related service or business enterprise, managed by one or more women entrepreneurs in proprietary concerns, or in which she/ they individually or jointly, have share capital of not less than 51 percent as partner/ shareholder/ directors of private limited company /members of co-operative society, is defined as a women enterprise"

वरिल व्याख्येवरून महत्वाच्या बाबी पुढिलप्रमाणे आहेत.

१. लघु उद्योग, उद्योगांशी संबंधित सेवा किंवा व्यवसायिक उपक्रम या स्वरूपाचे महिलांचे उपक्रम असु शकतात.
२. व्यक्तिगत मालकीचे उपक्रम, भागीदारी संस्था, सहकारी संस्था किंवा खाजगी मर्यादित संस्था, हयापैकी कोणत्याही पद्वतीने महिलांच्या उद्योगांचे संघटन करण्यात आले असावे.
३. महिलांच्या उद्योगांचा कारभार प्रत्यक्षात एक किंवा जास्त महिलाकडूनच सांभाळण्यात येत असावा.
४. उद्योगाच्या भांडवलामध्ये महिलांचे भांडवल व्यक्तिश: किंवा संयुक्तपणे किमान ५१ प्रतिशत असणे आवशक आहे.

महिला उद्योजकांची भूमिका उद्योगांच्या संचालनात व कारभारात प्रत्यक्ष व थेट असावी. हया उपक्रमाचे नेतृत्व महिला उद्योजकांकडेच असावे. म्हणजेच, महिला उद्योजकांच्या उद्योगांमध्ये किंवा उपक्रमामध्ये महिला उद्योजकांची वास्तविक भूमिका बाहुल्यासारखी कधीच नसावी, तर बाहुल्यांचा खेळ दाखविण—या कलाकारांसारखी असावी.

## महिला उद्योजकांचे वैशिष्टये :—

पुरूषांची उद्योजकता व महिलांची उद्योजकता यात फार अंतर नसले तरी महिलांच्या उद्योजकतेची वैशिष्टये वेगळी आहेत. महिलांची उद्योजकता प्रामुख्याने पुरूषांच्या पाठिंब्यावर असल्यामूळे पुरूषांची मदत घेत असतात. महिला उद्योजक हया मध्यमवर्गिय, उच्च मध्यमवर्गिय व श्रीमंत कुटुंबातुन आलेल्या असल्यामुळे त्यांच्यावर कुटुंबाचा प्रभाव असतो. आणि त्यांना उद्योजक बनविण्याकरिता प्रेरित सुद्वा करीत असतात. त्याचप्रमाणे सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातुन त्यांनी सवलती मिळवुन उद्योगाची वाढ

करीत असतात. काही—काही महिला उद्योजक हया पिढीजात व्यवसायातुन उद्योजक बनल्या आहेत. महिला उद्योजकतेची संख्या हळुहळु वाढत आहे.

१. उद्योजकीय प्रेरणांची भिन्नता
२. आर्थिक संपन्नतेची कौंटूबिक पार्श्वभूमी
३. पुरूषांचा पाठिंबा, उद्योजकतेचा आधार
४. लघु उद्योग क्षेत्रापुरती मर्यादित
५. पहिल्या पिढीची उद्योजकता
६. सवलतींची उपलब्धता
७. उद्योजकतेवर कौंटूबिक बाबिंचा प्रभाव
८. अभिप्रेरणेवर अनेक घटकांचा परिणाम

## महिला उद्योजकतेची कार्य:—

महिला उद्योजकांनाही उद्योगाची स्थापना व संचालनापासुन तर वस्तु व सेवा उपभोक्त्या पर्यंत पोहचविण्याकरिता तसेच उद्योगाचा विकास करण्याकरिता जे कार्य करावे लागतात त्या सर्व कार्याचा यात समावेश होतो.


१. उद्योगाची स्थापना करणे
२. वित्तीय गरज भागविणे
३. जोखीम स्वीकारणे
४. नवनिर्मिती घडवून आणणे
५. उद्योगाचा विकास घडवून आणणे
६. संधिचा शोध घेणे
७. उद्योगाचे नेतृत्व व व्यवस्थापन करणे

## महिला उद्योजकांचे प्रकार :—

महिलांना उद्योगाची स्थापना करण्याकरिता सर्व समावेशक सहाय केले जाते. महिला उद्योजक होण्यासाठी आवश्यक प्रवृत्ती, गुण व महात्वकांक्षा असणा—या स्त्रीयांचा शोध घेणे व त्यांना योग्य ते प्रशिक्षण देउन प्रेरित केल्या जातात.

महिलांना उद्योजकाचे कार्य करण्याचा मुळीच हेतु मनामध्ये नसतांना उद्योगामध्ये महिलांचा प्रवेश घडुन येतो व उद्योगाच्या संचालनाची जबाबदारी प्रशिक्षीत नसलेल्या एखाद्या महिलेकडे येते या परिस्थितीमध्ये महिला सक्षमपणे उद्योगाची स्थापना करून संचालन करतात व उद्योगाचा विकास करतात.

पुरूष आपल्या पत्नी किंवा मुलीच्या नावाने नवीन उद्योगाची स्थापना करून महिलांना समोर करतात. त्यामुळे महिलांचा उद्योग म्हणुन सरकारी विविध योजनेच्या माध्यमातुन महिला उद्योगांना सर्व विशेष सवलतीचा सहजपणे फायदा करूण घेतात. व सर्व व्यवहार मात्र पुरूषच करतो.



**महिला उद्योजकांची वाटचाल:—**

**तालिका नं. १.**
**भारतामध्ये विविध राज्यात उद्योजकांची नोंदणी**

| अ.क्र. | राष्ट्र | एकूण उद्योजक नोंदणी | महिला उद्योजक नेंदणी | प्रतिशत |
|---|---|---|---|---|
| १ | तामिळनाडू | ९६१८ | २९३० | ३०.३६ |
| २ | उत्तरप्रदेश | ७९८० | ३१८० | ३९.८४ |
| ३ | केरला | ५४८७ | २१३५ | ३८.९१ |
| ४ | पंजाब | ४७९१ | १६१८ | ३३.७७ |
| ५ | महाराष्ट्र | ४३३९ | १३९४ | ३२.१२ |
| ६ | गूजरात | ३८७२ | १५३८ | ३९.७२ |
| | एकूण | ३६०८७ | १२७९५ | .. |

महाराष्ट्रामध्ये एकूण उद्योजक नोंदणी ४३३९ असुन यापैकी महिला उद्योजक नोंदणी १३९४ आहे. पुरूष उद्योजकांच्या तुलनेत महिला उद्योजक ३२.१२ प्रतिशत आहेत.

**महिला स्वयंसहायता बचत गट:—**

आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणा—या महिला सक्षम असल्याशिवाय त्या राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात येउ शकत नाहीत. या उद्येशाने १९९० ला महिला स्वयंसहायता बचत गटाची संकल्पणा उदयास आली. या संकल्पनेचा उद्येश सामूहिक प्रयत्नातून महिला सक्षमिकरण आणि महिला उद्योजकतेत वाढ करून दारीद्र निर्मुलन करणे होय. महिला स्वयंसहायता बचत गटातील बचत सहकारी बॅंक, प्रदेशिक ग्रामिण बॅंक, खाजगी वाणिज्य बॅंक, सार्वजनिक वाणिज्य बॅंक, इत्यादी या बॅंका स्विकारतात. आणि त्यांना उद्योगासाठी कर्जाचा सुद्धा पुरवठा करतात.

**तालिका नं. २.**
**महाराष्ट्र राज्यात महिला स्वयंसहायता बचत गट व कर्ज पूरवठा**
**बॅंकांचे प्रकार:** सहकारी, प्रदेशिक ग्रामिण, खाजगी वाणिजिक, सार्वजनिक वाणिजिक

| विवरण | मार्च २०१४ | | | | मार्च २०१७ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुन स्वयंसहायता बचत गट | | महिला स्वयंसहायता बचत गट | | एकुन स्वयंसहायता बचत गट | | महिला स्वयंसहायता बचत गट | |
| | संख्या | रक्कम (कोटी) | संख्या | रक्कम (कोटी) | संख्या | रक्कम (कोटी) | संख्या | रक्कम (कोटी) |
| बचत | ६९२२७४ | ७४८.०५ | ५१८३५२ | ५५९.८० | ८४८२९१ | १२३८.४७ | ६२८१९२ | ३७१.१२ |
| कर्ज पुरवठा | ७२९०८ | ७१८.१३ | ६०३७४ | ५७१.१३ | ११२०४३ | १५४५.१९ | १०३९३९ | १३०० |

महाराष्ट्र राज्यात मार्च २०१४ मध्ये स्वयंसहायता बचत गट ६९२२७४ असुन एकून बचत ७४८.०५ कोटी रूपये आहे. यापैकी महिला स्वयंसहायता बचत गट ५१८३५२ असुन या गटाची बचत ५५९.८० कोटी रूपये आहे. या महिला स्वयंसहायता बचत गटापैकी ६०३७४ गटाला उद्योगासाठी एकून ५७१.१३ कोटी रूपये कर्ज पुरवठा करण्यात आले आहे. इतर गटाच्या तुलनेत महिला स्वयंसहायता बचत गटाची संख्या अधिक असून उद्योगासाठी वाटप केलेल्या कर्जाची रक्कम सुद्धा जास्त आहे.

त्याचप्रमाणे मार्च २०१७ मध्ये स्वयंसहायता बचत गट ८४८२९१असुन एकून बचत १२३८.४७ कोटी रूपये आहे. यापैकी महिला स्वयंसहायता बचत गट ६२८१९२ असुन या गटाची बचत ३७१.१२

कोटी रूपये आहे. या महिला स्वयंसहायता बचत गटापैकी १०३९३९ गटाला उद्योगासाठी एकून १३०० कोटी रूपये कर्ज पुरवठा करण्यात आले आहे. इतर गटाच्या तुलनेत महिला स्वयंसहायता बचत गटाची संख्या अधिक असून उद्योगासाठी वाटप केलेल्या कर्जाची रक्कम सुद्धा अधिक आहे.

महिला स्वयंसहायता बचत गटामूळे महिलांच्या उद्योजकतेला एक सुवर्ण मार्ग मिळालेला असून बचत गटाची संकल्पना आल्यामूळे महिलांच्या उद्योजकतेचे प्रमाण वाढले आहे.

महाराष्ट्र राज्य अलिकडेच राज्यात महिला उद्योजक धोरण २०१७ हे विशेष धोरण म्हणुन जाहीर केले आहे. देशात अशा प्रकारचे महिला उद्योजकांसाठी स्वतंत्र धोरण राबविणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे. महिला उद्योजक धोरण २०१७ ची उद्यीष्टे खालिल प्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र राज्यात सक्रिय सहभगास प्रोसाहण देणे.
२. महिला परिचालित उद्योगाचे प्रमाण सद्याच्या ९ प्रतिशता वरूण २० प्रतिशता पर्यंत वाढविणे.
३. आवश्यक व्यवसायिक वातावरण निर्माण करणे.
४. तांत्रिक परिचालनात्मक तसेच आर्थिक सहाय पुरवुन महिलांना रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे.

महिला उद्योजक निर्माण करून महिला उद्योजकतेत वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार महिलांना प्रोत्साहन देत आहे. त्याचप्रमाणे महिला उद्योजकतेच्या विकासासाठी उद्योजक महामंडळाची स्थापना केलेली आहे. महिला उद्योजकतेत वाढ करण्यासाठी अनेक संस्था कार्यरत सुद्धा आहेत.

## निष्कर्ष :—

'स्त्री व पुरुष' हे समाज व्यवस्थेचे घटक असुन या दोघांची परस्परपुरक अशीच भुमिका आहे. या दोन्ही वर्गाच्या परस्परपुरक भुमिकेवर प्रत्येक कुटुंबाचे अस्तित्व व प्रगती आणि उन्नती अवलंबुन असते. उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये एकंदरीत पुरुषांचे वर्चस्व असले तरी उद्योजकतेची निकोप वाढ व्हावी याकरीता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे महिलांनीही योगदान दिले आहे. महिला उद्योजक ब—याच लोकामध्ये अधिक विकासाची प्रमुख प्रेरक शक्ती बनली आहे. आधुनिक काळात विकसित व विकसनशिल अशा दोन्ही प्रकारच्या समाजामध्ये महिला स्वतः पुढाकार घेवुन उद्योजकांची भुमिका पार पाडण्याकरीता तयार झाल्या आहेत. व्यापार, उत्पादकता, प्रक्रिया आणि सेवा या क्षेत्रात महिला मोठ्या प्रमाणत सक्रिय सहभग घेत आहेत.

पुरूषांच्या उद्योजकतेच्या वैशिष्टयाच्या तुलनेत महिला उद्योजकतेचे वैशिष्टय थोडे वेगळे आहेत. महिलांची उद्योजकता प्रामुख्याने पुरूषांच्या पाठिंब्यावर असल्यामूळे पुरूषांची मदत घेत असतात. महिला उद्योजक हया मध्यमवर्गिय, उच्च मध्यमवर्गिय व श्रिमंत कुटुंबातुन आलेल्या असल्यामुळे त्यांच्यावर कुटुंबाचा प्रभाव असतो. आणि त्यांना उद्योजक बनविण्याकरिता प्रेरित सुद्वा करीत असतात. त्याचप्रमाणे सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातुन त्यांनी सवलती मिळवुन उद्योगाची वाढ करीत आहेत.

बचत गटाची संकल्पना आल्यामूळे महिला स्वयंसहायता बचत गट निर्माण झाले. इतर बचत गटाच्या तुलनेत महिला स्वयंसहायता बचत गटाची संख्या अधिक असून उद्योगासाठी वाटप केलेल्या कर्जाची रक्कम सुद्वा अधिक आहे. त्यामूळे महिलांच्या उद्योजकतेचे प्रमाण वाढले असून महिलांच्या उद्योजकतेला एक सुवर्ण मार्ग मिळालेला आहे असे म्हणता येईल.

महिला उद्योजक निर्माण करणे व महिला उद्योजकतेत वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देत आहे. त्याचप्रमाणे महिला उद्योजकतेच्या विकासासाठी उद्योजक महामंडळाची स्थापना केलेली आहे. महिला उद्योजकतेत वाढ करण्यासाठी अनेक संस्था कार्यरत सुद्वा आहेत.

## संदर्भग्रंथ सूची :—

१. डॉ. जोशी जयंत., उद्योजकता विकास, पिंपळापुरे अॅड पब्लिशर्स, नागपुर.
२. डॉ. देशमुख, प्रभाकर., उद्योजकता विकास—संकल्पना आणि व्यवहार, पिंपळापुरे अॅड पब्लिशर्स, नागपुर.
३. प्रा. मुलाणी, एम. यु., महिला स्वयंसहायता बचतगट, डायमंड पब्लिकेशन पुणे.

४. प्रा. सपकाळ, हनुमंत., महिला आणि बचतगट—उद्योजक (मासिक) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र औरंगाबाद, फेब्रुवारी २००८.
५. www.mahrashtra.govt.in
६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४—१५ ते २०१८—१९.



डॉ. रेकचंद गणपत गोंगले
एम.कॉम.,एम.फील.,पीएच.डी
सहयोगी प्राध्यापक, स्नातकोत्तर वाणिज्य विभाग, नबीरा महाविद्यालय, काटोल.